aglasem.com

2025

GOA BOARD QUESTION PAPERS

2024

Question Papers

Prepare yourself for upcoming Goa Board Exams

2024 IV 01 0930 Seat No. | | | | | |

Time : 3 Hours **Marathi (F.L.)**

Subject Code

S	1	1	1	2

Total No. of Questions : 57 (Printed Pages : 8) Maximum Marks : 80

सूचना : (*i*) प्रश्नांचा क्रमांक स्पष्ट लिहा.

(*ii*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*iii*) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

'अ' स्तंभातील पाठांची नावे व 'ब' स्तंभातील लेखकांची नावे यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 2

'अ' स्तंभ	'ब' स्तंभ
1. हत्तीचा दृष्टान्त	• द. ता. भोसले
2. आजुनही आठवतात	• इंदुमती जोंधळे
	• केसोबास
	• प्र. ई. सोनकांबळे

पुढील पर्यायांपैकी अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करून लिहा : 2

3. संसारात हालअपेष्टा सोसताना स्त्रिया .....

- भाकरीच्या भुकेल्या असतात.
- वात्सल्याच्या भुकेल्या असतात.
- गोड शब्दांच्या भुकेल्या असतात.
- प्रेमाच्या भुकेल्या असतात.

4. इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र विषय .....

- एकाकी बेटावर पळून येतात.
- नो मॅन्स लॅण्डवर पळून येतात.
- दक्षिण ध्रुवावर पळून येतात.
- गजबजलेल्या शहरात पळून येतात.

पुढीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 5

5. बाजी भिंवराव कैलासवासी कसे झाले ?

6. भाषेची अभिवृद्धी कोणाच्या अभिवृद्धीवर अवलंबून असते ?

7. बायकांना लग्नाला जाण्याचा मोह व्हावा म्हणून बहुरूपी कशाचे वर्णन करतो ?

8. कस्तुरीमृग कशाचा शोध लावण्यासाठी चौखूर धावत होता ?

9. लेखिका इंदुमती जोंधळेकर हिला कोल्हापुरातील कोणत्या शाळेत नोकरी मिळाली ?

10. केंब्रिजमध्ये जयंत नारळीकर यांचे मार्गदर्शक कोण होते ?

पुढीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 3

11. "चिमण्यांत परमेश्वर असतो."

12. ऐसा अवएवी युक्त तो हस्ति.।।

13. "कारण मनात काय चालले आहे हे बहिणीला समजायचे नाही."

पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सहा ते सात वाक्यांत लिहा : 6

14. 'परंतु आमचा भाऊ गेला' असे बाजीराव बल्लाळ पेशवे का म्हणतात ?

15. कांचनमृगाने कस्तुरीमृगाला अडवून काय सांगितले ?

16. इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या विषयांनी आपली कैफियत कशाप्रकारे मांडली आहे ?

'अ' स्तंभातील कवितांची नावे व 'ब' स्तंभातील कवींची नावे यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 2

	'अ' स्तंभ	'ब' स्तंभ
17.	सुखाचे ते सुख	• प्रकाश किनगावकर
18.	वारस	• संत नामदेव
		• लहू कानडे
		• संत तुकाराम

पुढील पर्यायांपैकी अचूक पर्याय निवडून कवितेच्या ओळी पूर्ण करून लिहा : 2

19. पंचप्राण व्याकुळ जाला।। त्याने माझा .....

- प्राण चालिला
- देह चालिला
- आत्मा चालिला
- जीव चालिला

20. तू शिकून मोठा झालास .....

- शहरात गेलास
- खेड्यात गेलास
- शेतात गेलास
- गावात गेलास

पुढीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : 3

21. भ्रमराला कशाची ओढ असते ?

22. वडील मुलाला कसे वाढवितात ?

23. मोकळे मैदान कशाच्या आधाराने उभे आहे ?

24. विद्यार्थ्यांमध्ये कोणती गुणवैशिष्ट्ये दिसतात, असे लहू कानडे ह्यांना वाटते ?

पुढीलपैकी कोणत्याही **एका** अवतरणाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. 3

25. "पोथी वाचून झोंपणे-स्मरुनि हें ओलावती लोचने."

26. तुला रामराम घालत असतील अडलेले-नडलेले.

पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी पाच ते सहा वाक्यांत लिहा : 6

27. सु-जन व्यक्तीची कोणती लक्षणे कवी वामन पंडितानी वर्णन केली आहेत ?

28. काम-क्रोधामुळे काय निघून जाते असे संत तुकारामांनी म्हटले आहे ?

29. मोकळ्या मैदानात कोणते बदल होत असलेले कवी रफीक सूरज यांना दिसतात ?

पुढीलपैकी कोणत्याही **एका** सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा : 2

30. आईवडिल

31. त्रिमूर्ती

पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा : 2

32. शांतीसारखे दुसरे कोणतेही सुख नाही.

पुढीलपैकी कोणत्याही **दोन** वाक्प्रचारांचा योग्य अर्थ लिहून योग्य वाक्यात उपयोग करून लिहा. 4

33. रक्ताचे पाणी करणे

34. अंगावर काटा उभा राहणे

35. संगोपन करणे

36. तमा नसणे.

संयुक्त वाक्य करा :

37. सायंकाळी मी क्रिडांगणावर खेळतो. मित्रांबरोबर फिरावयास जातो. 1

केवल वाक्य करा :

38. पाऊस पडला. शेतकऱ्यांना आनंद झाला. 1

वाक्य शुद्ध करून लिहा :

39. नारळीकरांसाठी त्यांच्या वडिलांनी घरात फला लावला होता. 1

योग्य विरामचिन्हांचा वापर करा :

40. बायकामुले धान्य देतात पैसाअडका देतात 1

पुढीलपैकी कोणत्याही **एका** अलंकाराचे लक्षण व एक उदाहरण लिहा : 2

41. अनुप्रास

42. रूपक

पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते. त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो. त्याच्या नाजूक पाकळ्या आणि सुरेख रंग डोळ्यांना सुखावतात. हा छोटासा अनुभव घेतानाही आपले मन प्रसन्न होऊन जाते. इवल्याशा फांदीवर वाऱ्याच्या लहरींनी डुलणारे ते फूल त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे; पण त्यामुळे त्याचे दिवसभरातील अस्तित्व आणि जाणाऱ्या येणाऱ्याला त्याने दिलेला आनंद या गोष्टी खोट्या ठरत नाही. आपणही आपले हे छोटेसे जीवन त्या फुलासारखेच सुंदर करू शकतो. या नाशवंत जीवनाला त्याच्या अस्तित्व कालापुरता का होईना, पण काही अर्थ प्राप्त करून देऊ शकतो. तसे करण्यातच या जीवनाचे काही सार्थक आहे. या जीवनाचा प्रवास

करत असताना आपल्या निकट राहून सोबत करणारी, आसपास वावरत धीर पुरवणारी, आपल्यापेक्षा चार पावले पुढे चालत राहून प्रेरणा देणारी अशी निरनिराळ्या कोटीतील माणसे आपल्याला भेटतात. त्यांच्यापैकी काहींच्या सहवासामध्ये निरामय आनंदाचे क्षण लाभतात.

43. आपले मन कधी प्रसन्न होऊन जाते ?

44. जीवनात कोणकोणती माणसे भेटतात ?

45. जीवनाचे सार्थक कशात आहे ?

46. फुलाबद्दल कोणते वैशिष्ट्य सांगितलेले आहे ?

47. 'जवळ' या शब्दाला परिच्छेदात दुसरा कोणता शब्द आला आहे ?

48. उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

किंवा

49. वरील उताऱ्याचा 1/3 सारांश लिहा व त्याला समर्पक शीर्षक लिहा. 6

पुढील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 5

बाळासाठी आई तुझा। जीव संसारी गुंतला
भक्तासाठी पांडुरंग। उभा मुक्याने राहिला।
प्रौढपणी झालो आज। तुझ्यापासुनिया दूर
तुला भेटायासि परी। जीव जाहला आतुर।
आतुरला माझा जीव। रमे पाडसात माझ्या
खेळवितो, जोजवितो। नातवंडालागी तुझ्या।।

50. आईचा जीव संसारात कोणासाठी गुंतला ?

51. पांडुरंग कोणासाठी कसा उभा राहिला ?

52. कवीचा जीव कोणास भेटण्यास आतुर झाला आहे ?

53. कवी आपला जीव कशात रमवतो ?

54. कवितेला योग्य नाव द्या.

55. पुढील संवाद पूर्ण करून लिहा : 5

अवनी : आई आज मी शाळेला जात नाही.

आई : ..... केला नाहीस काय ?

अवनी : मी माझा गृहपाठ केला पण माझे डोके .....

आई : गेल्या किती दिवसापासून तुला डोकेदुखी आहे ?

अवनी : .....

आई : पंधरा दिवस ? मग मला ..... ?

अवनी : सांगणार होते पण मला वाटले ..... थांबेल.

आई : मग आपण डोळ्यांच्या डॉक्टरकडे .....

अवनी : डोळ्यांचा डॉक्टर. नको माझे डोळे .....

आई : पण मला वाटते की .....

अवनी : मला चष्मा नको आहे. कारण .....

आई : दोन दिवस चिडवतील व मग .....

अवनी : ठीक आहे मग आपण डॉक्टरकडे जावूया.

56. विनया/विनय पिळगांवकर 'आशीर्वाद भवन' पेडणे गोवा येथून आपली मैत्रीण/मित्र साईश/स्वराली ह्याला/हिला राज्य पातळीवरील निबंध लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल त्याचे/तिचे अभिनंदन करणाऱ्या पत्राचा नमुना तयार करून लिहा. 7

किंवा

अभय/अंकिता नाईक, विद्यार्थी प्रतिनिधी, हनुमान विद्यालय, म्हापसा, बार्देश–गोवा येथून प्रसिद्ध लेखक 'प्रमोद जोशी' कुडाळ–महाराष्ट्र यांनी वार्षिक बक्षिस वितरण प्रसंगी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार मानत आहे असे समजून पत्र लिहा.

57. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **250** शब्दांत निबंध लिहा : 9

- प्रदूषण एक समस्या
- बेकार युवकाचे आत्मवृत्त
- आई एक थोर दैवत
- सूर्य उगवलाच नाही तर .....

QUESTION PAPERS

GET PREVIOUS YEAR QUESTION PAPERS FOR ALL CLASSES FOR CBSE, ISCSE, ISC AND ALL ALL STATE BOARDS HERE AT AGLASEM.COM

BOARD WISE

- Andhra Pradesh Board Question Papers
- Assam Board Question Papers
- Bihar Board Question Papers
- Chhattisgarh Board Question Papers
- Goa Board Question Papers
- Gujarat Board Question Papers
- Haryana Board Question Papers
- Himachal Pradesh Board Question Papers
- J&K State Board Question Papers
- Jharkhand Board Question Papers
- Karnataka Board Question Papers
- Kerala Board Question Papers
- Madhya Pradesh Board Question Papers
- Maharashtra State Board Question Papers
- Manipur Board Question Papers
- Meghalaya Board Question Papers
- Mizoram Board Question Papers
- Nagaland Board Question Papers
- Orissa Board Question Papers
- Punjab Board Question Papers
- Rajasthan Board Question Papers
- Tamil Nadu Board Question Papers
- Telangana State Board Question Papers
- Tripura Board Question Papers
- Uttarakhand Board Question Papers
- Uttar Pradesh (UP) Board Question Papers
- West Bengal (WB) Board Question Papers